**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, MAY-JUNE, 2019, VOL- 6/51*

# हैदराबाद संस्थानातील राष्ट्रवादाचा उदय

**नागवे कृष्णा अण्णासाहेब**
संशोधक विद्यार्थी, इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

*Scholarly Research Journal's* **is licensed Based on a work at** *www.srjis.com*

भारताच्या स्वातंत्र्यानंतर हैदराबाद हे निजामाचे संस्थान भारताची समस्या म्हणून पुढे आले होते. हैदराबाद संस्थान निजामाच्या ताब्यात होते. केंद्रीय सत्तेच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन निजामाने 1724 मध्ये हैदराबाद येथे आपले स्वतंत्र राज्य निर्माण केले होते. हैदराबाद संस्थानात एकूण सात निजाम होऊन गेले त्यांच्या कार्यकाळात हैदराबाद राज्यातील मराठवाडा, तेलंगण, कर्नाटकचा काही भाग या भागातील जनतेला निजामाच्या अन्यायाचा सामना करावा लागला. त्याचीच परिणीती ही राष्ट्रवादात झाली.

**राष्ट्रवाद संकल्पना व निजाम राज्य:**

“राष्ट्र आणि राष्ट्रभूमी यांना आदर्श मानून त्यांवर निष्ठा ठेवणारी आधुनिक राजकीय प्रणाली व त्यावर आधारलेला ध्येयवाद”.1 अशी राष्ट्रवादाची व्याख्या ही साधारणत: केली जाते. निजामाच्या राज्याला ही व्याख्या लागू करताना अडचणी अशा होत्या की निजाम हे सर्व सत्ताधारी असायचे लोकशाही मुल्यांवर निजामाची प्रशासकीय व्यवस्था चालत नव्हती तर ती सरंजामशाहीच्या आधारावर चालत असे. कायदा, न्याय आणि प्रशासनाचा प्रमुख निजाम होता. त्याच्या लहरी प्रमाणे कारभार चालत असे. ‘ निजाम आणि आसफजाही घराण्याच्या बुरसटलेल्या सरंजामशाही व हुकूमशाही प्रवृत्तीला साजेल असेच हैदराबाद संस्थानाचे व तेथील राज्यव्यवस्थेचे अंतरंग होते.’[2]

उपरोक्त विधानावरून आपणास निजाम राज्याच्या स्वरूपाची कल्पना आल्याशिवाय राहात नाही. अशा ठिकाणी आदर्श राष्ट्रवादी किंवा राष्ट्रवाद ही शासकाला न पचणारी गोष्ट असेल यात शंका किंवा वावगे नसावे. आपली मातृभूमी ही स्वातंत्र्याचा व हक्काचा आधार व्हावे अशी प्रत्येक नागरिकांची इच्छा असते. ही इच्छा निजामाच्या काळात पूर्ण होणे शक्य नव्हते. अन्यायाच्या वाढत्या प्रमाणाचा परिणाम हैदराबाद संस्थानात राष्ट्रवादाचा उदय आणि विकास झाला. या राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**प्रशासनातील मुस्लिमांचे वर्चस्व:**

निजामाच्या प्रशासकीय व्यवस्थेत भेदाभेद पाळण्यात. हिंदू समाजाला नोकरीत ठेवण्याचे प्रमाण कमी होते. 'मुस्लिम 11 टक्के असूनही सरकारी नोकऱ्यांत त्यांचाच भरणा प्रचंड होता, तर हिंदूचे प्रमाण अवघे 20 टक्के होते.[3] प्रशासनात मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढल्याने प्रशासकीय कामे ही मुस्लीम समाजाची मिरासदारी बनली आणि त्याचा परिणाम हिंदू लोकांवर अन्याय निजाम शासनाच्या माध्यमातून करण्यात आला. मुस्लिम प्रभावित प्रशासनामुळे हैदराबाद संस्थानातील जनता त्रस्त झाली. निजामाचे फर्मान हे जनतेसाठी कायदा होते आणि त्याचा परिणाम मुस्लिमेतर समाजाला मोठ्या प्रमाणावरती भोगावा लागला. त्यामुळे अन्यायाच्या विरोधात हैदराबादी जनता एकत्र आली. त्यांनी निजामाच्या या विषमतावादी व्यवस्थेला विरोध केलात. यातूनच राष्ट्रवादाची प्रचंड लाट मराठवाडा आणि इतर भागांतून निर्माण झाली.

**शिक्षणाचे उर्दू माध्यम:**

निजामाच्या राज्यात शिक्षणाचे माध्यम उर्दू होते. उर्दू माध्यमामुळे बहुसंख्य हिंदू व मुस्लिमेतरांना शिक्षणाच्या प्रवाहात जास्त प्रमाणात सामाविष्ट होता आले नाही. हिंदू व मुस्लिमेतरांचे शिक्षणाचे प्रमाण त्यामुळे कमी झाले. या काळात भाषेच्या व माध्यमाच्या बरोबरच महत्त्वाची बाब म्हणजे निजामाने घेतलेला पराकोटीचा जातीय पवित्रा हा शैक्षणिक संस्थांतून शिकविण्यात यायचा. यामुळे हिंदू व दलित व मुस्लीम इतर समाजामध्ये असंतोष निर्माण झाला. त्याचा परिणाम ते निजामाच्या विरोधात उभे राहिले आणि राष्ट्रवादाची प्रचंड ताकद या लढ्याला देण्याचे कार्य त्यामुळे घडून आले.

**सरंजामशाही व्यवस्था:**

निजामाच्या राज्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सरंजामशाही राज्य होय. निजाम हा प्रशासनाचा प्रमुख होता. हैदराबाद संस्थानात कृषी हाच मुख्य व्यवसाय असल्याने शेती महसूल गोळा करण्याचे काम निजाम त्यांच्या सरंजामांद्वारे करीत होता. खालसा ही निजामाची जहागीर होती. सर्फे खास जागीर किंवा इनाम ह्या गैरसरकारी म्हणजे निजामी सरंजामी व्यवस्थेद्वारे चालविल्या जाणाऱ्या व्यवस्था होत्या. कृषी ही मान्सूनच्या पाण्यावर अवलंबून होती आणि जलसिंचनाच्या साधनांचा अभाव होता. याचा परिणाम उत्पादन कमी आणि कराचा बोजा जास्त होत. यामुळे शेतकरी व शेतीवर आधारित लोकांचे जीवन दुःखमय बनले. त्यातच सरंजामशाही व्यवस्थेतील जागीरदार वतनदार आणि इतर अधिकारी यांचे प्रभुत्व आणि शोषण यामुळे जनतेत असंतोष निर्माण झाला होता. 'जागीरदार हे मिनी निजामच होते'. ते नजराणे आणि बक्षिसांच्या माध्यमातून शेतकरी व कृषी संबंधित लोकांचे शोषण करीत

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

असल्याने हैदराबादी जनतेत राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली आणि सरंजामशाही व निजाम यांच्या विरोधात लढा उभारण्यात आला.

**संस्था आणि संघटना:**

कोणतेही संघटन लोकांना एकत्रित करण्याचे काम करत असते. या धर्तीवर हैदराबादी जनतेचा आवाज बनण्याचे आणि चळवळी उभे करण्याचे कार्य हैदराबाद संस्थानात अनेक संस्था आणि संघटनांच्या माध्यमातून करण्यात आले. त्यात आर्यसमाज, महाराष्ट्र परिषद, हैदराबाद स्टेट काँग्रेस त्याचप्रमाणे इतर वैयक्तिक संस्था व संघटनांच्या माध्यमातून समाजमनाची वैचारिक मशागत करण्यात आली. त्यांच्या माध्यमातून हैदराबादी जनता एकत्रित आली व त्यांच्यात एकत्वाची भावना निर्माण झाली.

**इत्तेहादुल मुसलमीन:**

सन 1928 मध्ये ही संघटना स्थापन झाली. सुरुवातीच्या काळात ही मुस्लिमांनापुरती व धार्मिक संघटना होती. पण नंतरच्या काळात या संघटनेचा अध्यक्ष कासीम रझवी बनला आणि या संघटनेच्या स्वरूपात बदल झाला. सुरुवातीच्या काळात बहाद्दूर जंग व नंतर कासीम रझवी यांनीही संघटना बळकट केली. 1944 मध्ये बहादूर जंगा चा मृत्यू झाल्यावर या संघटनेचे नेतृत्व कासिम रझवी याकडे आले. कासिम रझवी च्या नेतृत्वात हिंदुविरोधी, स्वातंत्र्य विरोधी कार्य करण्यात आले. त्यात लोकांना भयभीत करणे, स्वातंत्र्यानंतर शासकीय ऑफिसचा ताबा घेणे, लष्कराच्या मदतीने चवळी दडपून टाकणे इत्यादीचा समावेश होतो. अशा प्रकारे हैदराबाद संस्थानातील जनतेवर अन्याय या संघटनेच्या माध्यमातून झाला. 'मराठवाड्यातील बंडखोरांना नष्ट करण्यासाठी अरब व पठाण पाठवावेत'.[4] अशी रणनीती या संघटनेच्या माध्यमातून आखण्यात आली होती यावरून आपणास त्या काळातील अन्यायाची कल्पना येइल यातूनच अन्यायाच्या कोटी हैदराबाद राज्यातील जनतेमध्ये राष्ट्रवाद निर्माण झाला.

**वृत्तपत्रे व त्याची जागृती:**

वृत्तपत्रे ही जागृतीचे कार्य करतात आणि त्याची जागृती लोकांना राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्यास मदत करत असते. निजामाच्या काळात वृत्तपत्र स्वातंत्र्यावर गदा आणण्यात आली होती. 'मराठवाडा' सारख्या साप्ताहिकाने त्या कालखंडामध्ये जनतेत जागृती केली. त्याचप्रमाणे 'निजाम विजय' नावाच्या वृत्तपत्रानेही त्या कालखंडामध्ये लोक मनाची मशागत करून जागृत करण्याचे कार्य केले.

'निजामी राजवटीने केलेल्या मुस्कटदाबी विरुद्ध जनतेने आवाज उठवून नये, संस्थानातील परिस्थिती बाहेर कळू नये याची सरकार पुरेपूर काळजी घेत असे. वृत्तपत्र काढायचे तर सरकारची परवानगी घ्यावी लागेल. संस्थाना बाहेर प्रकाशित होणाऱ्या 'केसरी', 'मराठा', 'ज्ञानप्रकाश' इत्यादी बऱ्याच वृत्तपत्रांना संस्थानात बंदी होती.[5]

**समारोप:**

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

अशाप्रकारे एकंदरीतच विचार करता निजामाच्या कालखंडामध्ये लोकांच्या सामाजिक धार्मिक व सांस्कृतिक जीवनामध्ये निजामी प्रशासन व सरंजामशाही वारंवार हस्तक्षेप करत असल्यामुळे आणि त्याचा परिणाम म्हणून जनतेचे हक्क आपोआप हिरावून घेतले जात असल्यामुळे जनतेच्या मनामध्ये या राज्याविषयी प्रचंड प्रमाणात असंतोष निर्माण झाला होता. वर दिलेल्या कारणांमध्ये तो असंतोष फक्त सामाविष्ट होता असे नाही तर या असंतोषाचा पाठीमागे अनंत कारणांची एक साखळी होती. या कारणांच्या साखळीने पुढे राष्ट्रवादाच्या अनेकानेक शृंखला विकसित करण्याचे काम केले आणि त्याचाच परिणाम म्हणून हैदराबाद राज्य भारतामध्ये सामाविष्ट झाले आणि मराठवाडा हा निजामाच्या तावडीतून मुक्त झाला.

**संदर्भसूची:**

*https://vishwakosh.marathi.gov.in/31253/*

भालेराव अनंत *(1987).* हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, मुंबई*:* मौज प्रकाशन, प्रथम आवृत्ती, पृ. क्र*. 07*

तत्रैव, पृ. क्र*. 07*

तत्रैव, पृ. क्र*. 243*

मेदककर प्रकाश *(2003),* महाराष्ट्राचे शिल्पकार स्वामी रामानंद तीर्थ, मुंबई*:* महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ, प्रथम आवृत्ती, पृ. क्र*. 05*

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*